नि.फौ. खटला क्रमांक.११/२०१५

सरकार विरुध्द नेमसिंग

**निशाणी क्रमांक – ११**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०१**

माझे नांव – कमाल उस्मानसाब शेब,

वय – ५० वर्षे नेमणुक – हेड कॉन्स्टेबल,

पोलीस स्टेशन किल्लारी, ता.औसा, जि.लातूर

**शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एन. ए. भांगे**

**(फौजदारी प्रकिये संहितेच्या कलम २९९ अन्वये)**

**०१.** मी आरोपींना ओळखेन किंवा कसे ते बराच काळ उलटल्याने मी सांगू शकत नाही. मी फिर्यादीस ओळखतो ते मयत आहेत. दिनांक २७.११.२०११ रोजी मी अहमदपूर पोलीस स्टेशन येथे पोलीस नाईक म्हणून कार्यरत होतो. त्यादिवशी पोलीस स्टेशन प्रभारी म्हणून ए.एस.आय. कांबळे कार्यरत होते. फिर्याद श्री कांबळे यांनी नोंदवून तपास माझ्याकडे वर्ग केला. तपासाच्या अनुषंगाने मला फिर्याद, बँकेचा उतारा व साक्षीदार क्र.१ यांची टि.सी. असे कागदपत्र मिळाले. मी फिर्यादीचे सविस्तर पुरवणी जबाब घेतला. फिर्यादी यांनी हजर केलेल्या साक्षीदारांचे तपासटिप्पणे त्यांच्या सांगण्याप्रमाणे घेतली. आरोपींचे जबाब घेतले. आरोपीविरूध्द सबळ पुरावा मिळून आल्याने आरोपीविरूध्द दोषारोपपत्र दाखल केले. तपासाअंती आरोपीने फिर्यादीच्या मुलास मिलीट्रीमध्ये नौकरी लावतो म्हणून १ लाख रुपये घेतल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर मी आरोपीविरूध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**उलटतपास आरोपींतर्फे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २९९ अन्वये राखीव**

श्रृवणोत्तर स्वीकृत,

माझे समक्ष,

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2025.11.29 13:39:11 +0530

दिनांक –२८.११.२०२५

**(स्वानंदी दे. वडगांवकर)**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहमदपूर.

न्या.द.प्र.वर्ग.